बाप्पा मोरया...

मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

www.newsexpressmarathi.in » पुणे, पिंपरी-चिंचवड » बुधवार, दिनांक २० सप्टेंबर २०२३। पान १

# महापालिकेने गुंडाळले 'पे ॲण्ड पार्क' धोरण!

## रस्त्यावर पार्क केली जात आहेत अस्ताव्यस्तपणे वाहने

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** पिंपरी- चिंचवड महापालिकेने गाजावाजा करत आणलेले सशुल्क पार्किंग (पे ॲण्ड पार्क) धोरण काही महिन्यातच बासनात गुंडाळले आहे. त्यामुळे शहरातील वाहतूक कोंडीच्या समस्येत भर पडत आहे. रस्त्यावर अस्ताव्यस्तपणे वाहने पार्क केली जात आहेत. पिंपरी-चिंचवड शहराच्या लोकसंख्येबरोबरच वाहनांची संख्या वाढत आहे. सद्यस्थितीत शहराची लोकसंख्या २७ लाख असून वाहनांची संख्या २७ लाख आहे. गेल्या तीन वर्षांत तीन लाख ६४ वाहनांची भर पडली आहे. त्यामुळे वाहतुकीची मोठी समस्या निर्माण होत आहे.

महापालिका प्रशासनाने वाहतूक नियंत्रण, इंधन बचत, सार्वजनिक वाहतुकीचा सुयोग्य वापर आणि त्यामुळे होणारे वैयक्तिक फायदे यांसाठी सशुल्क पार्किंग (पे ॲण्ड पार्क) धोरण आणले. पहिल्या टप्प्यात शहरातील ८० ठिकाणी 'पे ॲण्ड पार्क' करण्याचा निर्णय घेतला. प्रत्यक्षात २० ठिकाणीच १ जुलै २०२१ पासून 'पे ॲण्ड पार्क'च्या अंमलबजावणीला सुरुवात झाली.

वाहतूक पोलिसांना पाच टोईंग व्हॅन दिल्या. तरीही योजना बारगळली. काही महिन्यातच निर्मला ऑटो केअर या ठेकेदाराने उत्पन्न आणि कर्मचारी वर्गावर होणारा खर्च पाहता




काम आपल्याला परवडत नसल्याचे सांगत माघार घेतली. त्यामुळे धोरण गुंडळले. राजकीय विरोधामुळे महापालिका प्रशासनानेही धोरणाच्या अंमलबजावणीवर भर दिला नाही. पोलिसांनीही नो-पार्किंगमधील वाहनांवर कारवाईस टाळाटाळ केली. नागरिकांनीही प्रचंड विरोध केला. पार्किंगचे शुल्क देण्यास टाळाटाळ केली. त्यामुळे वाद होवू लागले. परिणामी, ठेकेदाराने माघार घेतली.अवघ्या काही महिन्यातच धोरण बासनात गेले. पार्किंग धोरण नसल्याने वाहने रस्त्यावर अस्ताव्यस्तपणे पार्क केली जातात. त्यामुळे वाहतूक कोंडीत भर पडत आहे. केवळ चिंचवडगावातील चापेकर चौक, संत मदर तेरेसा उड्डाणपूल, निगडीतील पुल अशा तीन ठिकाणी प्रायोगिक तत्त्वावर 'पे ॲण्ड पार्क' सुरु आहे. पार्किंग धोरणाला नागरिकांचा प्रचंड विरोध झाला. पोलिसांचेही सहकार्य मिळाले नाही. ठेकेदाराच्या कामगारांना दमदाटीचे प्रकार वाढले. त्यामुळे ठेकेदाराने माघार घेतली. तीन ठिकाणी पुलाखाली अंमलबजावणी सुरु आहे. महापालिकेच्या आरक्षणावर वाहनतळ उपलब्ध करण्याचा विचार सुरु असल्याचे कार्यकारी अभियंता बापूसाहेब गायकवाड यांनी दिली.

### नो-पार्किंग कारवाईस टाळाटाळ

**» पोलिसांनीही नो-पार्किंगमधील वाहनांवर कारवाईस टाळाटाळ केली. नागरिकांनीही प्रचंड विरोध केला. पार्किंगचे शुल्क देण्यास टाळाटाळ केली. त्यामुळे वाद होवू लागले. परिणामी, ठेकेदाराने माघार घेतली.अवघ्या काही महिन्यातच धोरण बासनात गेले. पार्किंग धोरण नसल्याने वाहने रस्त्यावर अस्ताव्यस्तपणे पार्क केली जातात. त्यामुळे वाहतूक कोंडीत भर पडत आहे. केवळ चिंचवडगावातील चापेकर चौक, संत मदर तेरेसा उड्डाणपूल, निगडीतील पुल अशा तीन ठिकाणी प्रायोगिक तत्त्वावर 'पे ॲण्ड पार्क' सुरु आहे.**

# पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयात वाहन चालक दिन उत्सहात साजरा!

## मोटर परिवहन विभागातील वाहनचालकांचा सत्कार

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयात वाहन चालक दिन सोमवारी (दि. १८) साजरा करण्यात आला. यामध्ये मोटर परिवहन विभागातील वाहनचालकांचा सत्कार करण्यात आला. पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या मोटर परिवहन विभागात कार्यरत असलेल्या वाहन चालकांना सह पोलीस आयुक्त डॉ. संजय शिंदे, पोलीस उप आयुक्त डॉ. काकासाहेब डोळे, सहाय्यक आयुक्त भास्कर डेरे यांच्या हस्ते पुष्पगुच्छ आणि



प्रशस्तीपत्र देण्यात आले. पोलीस चालक अंमलदार यांनी शासकीय गाडी चालवत असताना अपघात टाळण्यासाठी कोणत्या गोष्टींची खबरदारी घेतली पाहिजे, याबाबत वरिष्ठांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमात देशभक्तीपर गीतांचा कार्यक्रम घेण्यात आला. वाहन चालक पोलीस अंमलदारांची मोफत नेत्र तपासणी करण्यात आली. कार्यक्रमासाठी सर्व पोलीस अंमलदार आपल्या कुटुंबासह उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन पोलीस निरीक्षक मोटर परिवहन विभाग मंगेश पाटील यांनी केले.

# किवळेत केरला पथकाची मिरवणूक!

**कवळे। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** मुकाई चौक येथील श्री बापदेव मित्र मंडळाच्या वतीने केरला पथक आणि ढोल-लेझीम पथकासह उत्साही वातावरणात मिरवणूक काढून श्री गणेशाची प्रतिष्ठापना केली. माजी सरपंच बापूसाहेब तरस यांच्या हस्ते श्रींची प्रतिष्ठापना झाली. या वेळी अध्यक्ष सुमीत तरस, शिवसेनेचे पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष नीलेश तरस व मंडळाचे अन्य सदस्य उपस्थित होते. किवळेतील त्रिशूल मित्र मंडळ, सिद्धिविनायक मित्र मंडळ, सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ व पंचशील मित्र मंडळाच्या वतीने श्रींची उत्साही वातावरणात प्रतिष्ठापना करण्यात आली. रावेत भोंडवे वस्ती येथील कळमजाई मित्र मंडळ, अष्टविनायक मित्र मंडळाच्या वतीने श्रींची प्रतिष्ठापना करण्यात आल्याचे सागर भोंडवे यांनी सांगितले. रावेत गावठाणातील धर्मराज प्रतिष्ठान, शिंदेवस्ती येथील गणेश मित्र मंडळ, ओम साई मित्र मंडळ प्रतिष्ठानच्या वतीने श्रींची विधिवत प्रतिष्ठापना करण्यात आल्याचे तुषार भोंडवे, विजय भोंडवे यांनी सांगितले. मामुर्डी गाव येथील मायटी युथ क्लबच्या वतीने ढोल-ताशांसह पारंपरिक पद्धतीने मिरवणूक काढून श्रींची प्रतिष्ठापना करण्यात आल्याची माहिती विजयेंद्र राऊत यांनी दिली.

# रेड झोन हद्द निश्चितीसाठी महिनाभरात मोजणी!

## आमदार महेश लांडगे यांनी पुढाकार घेतला




**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।** रक्षण विभागाच्या देहू ॲम्युनिशन डेपो व दिघी मॅगझीन डेपो या भागातील 'रेड झोन'चे मार्किंग झालेले नाही. त्यामुळे रेड झोनची मोजणी करून नकाशा प्रसिद्ध करण्यासाठी प्रशासनाने कार्यवाही करावी. यासाठी आमदार महेश लांडगे यांनी पुढाकार घेतला आहे. पुणे येथील जिल्हाधिकारी कार्यालयात 'रेड झोन'बाबत सोमवारी बैठक घेण्यात आली. आमदार लांडगे, जिल्हाधिकारी राजेश देशमुख, जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख सूर्यकांत मोरे, निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम, नगर रचना उपसंचालक प्रसाद गायकवाड, तहसीलदार अर्चना कदम, 'पीएमआरडीए' नगर रचना विभागाचे दशरथ पवार, पिंपरी-चिंचवड नगर भूमापन अधिकारी अमित ननावरे व संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते. संरक्षण विभागाने दिघी आणि देहू मॅगझीन डेपोच्या आवारातील 'रेड झोन'ची हद्द निश्चित करावी. त्यासाठी सर्व्हेक्षण व मोजणी करून नकाशा प्रसिद्ध करावा, अशी मागणी लांडगे यांनी केली. निगडी, यमुनानगर, कृष्णानगर, ट्रान्सपोर्टनगर, सेक्टर २०,२१,२२,२३ व २४ परिसरातील 'रेड झोन'ची हद्द निश्चितीबाबत अनेक वर्षांपासून प्रश्न प्रलंबित आहे. या भागातील सुमारे सात हजार कुटुंबांना बांधकाम परवानगी, महसुली कागदपत्रे, वारस नोंदी याबाबत तांत्रिक अडचणींचा सामना करावा लागतो. याबाबत जिल्हा प्रशासन, संरक्षण विभाग आणि महापालिका प्रशासनाकडे पाठपुरावा सुरू आहे, अशी त्यांनी केली. याला जिल्हा प्रशासनाने सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. पिंपरी चिंचवड महापालिकेने नगर रचना विभागामार्फत 'रेड झोन' मोजणीबाबत प्रस्ताव नव्याने सादर करावा. महिनाभराच्या कालावधीत भूमी अभिलेख विभागाने जिल्हाधिकारी यांच्या मान्यतेने हद्द निश्चित करावी यासाठी भूमी अभिलेख आणि संरक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी सहकार्य करावे, अशा सूचना जिल्हाधिकारी राजेश देशमुख यांनी संबंधित विभागांना दिल्या आहेत.

### पालिका प्रशासनाकडे पाठपुरावा

» निगडी, यमुनानगर, कृष्णानगर, ट्रान्सपोर्टनगर, सेक्टर २०,२१,२२,२३ व २४ परिसरातील 'रेड झोन'ची हद्द निश्चितीबाबत अनेक वर्षांपासून प्रश्न प्रलंबित आहे. या भागातील सुमारे सात हजार कुटुंबांना बांधकाम परवानगी, महसुली कागदपत्रे, वारस नोंदी याबाबत तांत्रिक अडचणींचा सामना करावा लागतो. याबाबत जिल्हा प्रशासन, संरक्षण विभाग आणि महापालिका प्रशासनाकडे पाठपुरावा सुरू आहे, अशी त्यांनी केली. याला जिल्हा प्रशासनाने सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.

# पिंपरी-चिंचवड गणेशोत्सवात ३ हजार पोलिसांचा बंदोबस्त!

## कायदा आणि सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी पोलिसांवर



**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।** पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत दीड हजारपेक्षा अधिक गणेशोत्सव मंडळांना परवानगी देण्यात आली आहे. गणेशोत्सव कालावधीत शहरात मोठ्या प्रमाणात गर्दी होते. त्यामुळे कायदा आणि सुव्यवस्था राखण्याची मोठी जबाबदारी पोलिसांवर येते. पिंपरी-चिंचवड शहरात गणेशोत्सवासाठी बाहेरून बंदोबस्त मागवण्यात आला आहे. गणेशोत्सवासाठी एक अपर पोलीस आयुक्त, पाच उपायुक्त, आठ सहायक आयुक्त, ५० पोलीस निरीक्षक, १४५ सहायक निरीक्षक आणि उपनिरीक्षक, एक हजार ८४० अंमलदार एवढे मनुष्यबळ उपलब्ध आहे. चार पोलीस निरीक्षक, २० सहायक निरीक्षक आणि उपनिरीक्षक, ४०० पोलीस कर्मचारी, ६०० होमगार्ड, एसआरपीएफच्या दोन कंपनी, श्वान बॉम्ब शोधक आणि नाशक विभागाची दोन पथके ही अधिकची कुमक शहर पोलिसांना मिळाली आहे. गणेशोत्सव कालावधीत पाच दिवस रात्री बारापर्यंत ध्वनिक्षेपक लावण्यासाठी परवानगी दिली आहे. २३ ते २८ सप्टेंबर या दिवशी ही परवानगी असेल. सातव्या दिवशी अनेक भागातील विसर्जन होते. मात्र, त्या दिवशी ध्वनिक्षेपक वापरण्यासाठी परवानगी देण्यात आलेली नाही. त्यामुळे रात्री दहा वाजता ध्वनिक्षेपक बंद करण्याचे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

# जुनी सांगवी-दापोडीत ढोल-ताशांचा गजर!



**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।** जुनी सांगवी, दापोडी परिसरात मंडळांसह घरगुती गणपतीचे सवाद्य मिरवणुका काढत पावसाच्या रिमझिम सरीसोबत भक्तिमय वातावरणात प्रतिष्ठापणा करण्यात आली. 'गणपती बाप्पा मोरया'चा जयघोष व मूर्ती खरेदीसह पूजा साहित्य, देखावे सजावटीसाठी लागणारे साहित्य खरेदीसाठी बाजारपेठेत गर्दी झाली होती.येथील सीझन सोशल ग्रुप प्रशांत शितोळे मित्र परिवाराच्या सांगवीच्या राजाची सवाद्य मिरवणूक काढून प्रतिष्ठापणा करण्यात आली. मधुबन मित्र मंडळ ट्रस्ट, राहिमाई महिला प्रतिष्ठान संयुक्त शिवमित्र मंडळ, रणझुंजार मित्र मंडळ, आनंद नगर मित्र मंडळ, शितोळे नगर क्रिडा व युवक मंडळ, ढोरे नगर मित्र मंडळ, समर्थ मित्र मंडळ, महादेव आळी सांगवी गावठाण मित्र मंडळ, गंगानगर मित्र मंडळ, अखिल ममतानगर मित्र मंडळ आदी मंडळांनी गणरायाची प्रतिष्ठापना केली. आकर्षक पद्धतीने सजविलेले रथ ढोल-ताशांच्या गजरात गणेश मंडळांनी मिरवणूक काढून गणपतीला विधिवत विराजमान केले.

# शाळा आता दत्तक घेता येणार!

## राज्यातील शाळांसाठी ‘दत्तक शाळा योजना’ राबवण्यात येणार

**पुणे | न्यूज एक्सप्रेस मराठी |** राज्यातील शासकीय, तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सर्व माध्यमांच्या शाळांसाठी ‘दत्तक शाळा योजना’ राबवण्यात येणार आहे. ही योजना राबवण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिल्यानंतर आता शालेय शिक्षण विभागाने या संदर्भातील शासन निर्णय जारी केला असून, देणगीदाराला पाच किंवा दहा वर्षांसाठी शाळा दत्तक घेता येईल. राज्यातील शहरी, ग्रामीण भागात समाजातील दानशूर व्यक्ती, स्वयंसेवी संस्था, कॉर्पोरेट ऑफिस आदींच्या सहकार्यातून शाळांसाठी पायाभूत सुविधा व आवश्यक संसाधनांची उपलब्धता वाढवून त्याद्वारे गुणवत्तापूर्ण, दर्जेदार शिक्षणाचा प्रसार करण्याचा या योजनेचा मूळ उद्देश आहे. यात समाजातील



दानशूर व्यक्ती, स्वयंसेवी संस्था, कंपन्यांना विशिष्ट शाळा दत्तक घेता येईल. या शाळेच्या गरजेनुसार त्यांना आवश्यक वस्तू व सेवांचा पुरवठा करता येईल. त्याचप्रमाणे अतिरिक्त वर्ग खोल्यांचे बांधकाम, इमारतींची दुरुस्ती, देखभाल व रंगरंगोटी या मार्गाचा देखील अवलंब करण्यास मुभा असेल. दत्तक शाळा योजनेंतर्गत सर्वसाधारण पालकत्व, नामकरण आधारित विशिष्ट पालकत्व अशा दोन पद्धतीने देणगी देता येईल. ‘अ’ आणि ‘ब’ वर्ग महानगरपालिका क्षेत्रातील शाळांसाठी पाच वर्षे कालावधीसाठी देणगीचे मूल्य दोन कोटी, दहा वर्षे कालावधीसाठी तीन कोटी रुपये राहील. तर ‘क’ वर्ग महानगरपालिका क्षेत्रातील शाळांसाठी हे मूल्य अनुक्रमे एक कोटी आणि दोन कोटी रुपये, तसेच ‘ड’ वर्ग महानगरपालिका, नगर परिषदा व ग्रामीण भागातील शाळांसाठी हे मूल्य अनुक्रमे ५० लाख आणि एक कोटी रुपये होत असल्यास देणगीदाराच्या इच्छेनुसार त्याने सुचवलेले नाव शाळेस त्या विशिष्ट कालावधीसाठी देता येईल. या योजनेत रकमेच्या स्वरूपात देणगी देता अथवा स्वीकारता येणार नाही. कॉर्पोरेट ऑफिसना सीएसआरच्या माध्यमातून अशा प्रकारची देणगी देता येईल. स्थापत्य व विद्युत काम, काळानुरूप आवश्यक असणारे शैक्षणिक साहित्य, डिजिटल साधने, आरोग्य सुविधा, रेन वाटर हार्वेस्टिंग, सॅनिटरी पॅड यंत्र अशा पायाभूत आणि भौतिक सुविधांसाठी वस्तू, सेवांच्या स्वरूपात देणगी देता येईल, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

### शिक्षण आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय समिती

**» योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शिक्षण आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय समन्वय समिती स्थापन करण्यात येईल. एक कोटी आणि त्याहून अधिक मूल्यांचे प्रस्ताव या समितीस सादर करण्यात येतील. क्षेत्रीय स्तरावर महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषदांच्या शाळांसाठी अनुक्रमे आयुक्त, महानगरपालिका, संबंधित जिल्हाधिकारी, संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या स्तरावर समन्वय समिती स्थापन करण्यात येतील. या समितीस एक कोटीहून कमी मूल्याच्या प्रस्तावांची छाननी करून त्यास मान्यता देण्याचे अधिकार असतील.**

# आम्हाला दया नको, समान वागणूक हवी!

## तृतीयपंथी समाजसेविका आम्रपाली मोहिते यांचे मत

**पुणे | न्यूज एक्सप्रेस मराठी |** आम्हाला दया नको तर समान वागणूक हवी, असे तृतीयपंथी समाजसेविका अमित उर्फ आम्रपाली मोहिते यांनी 'स्व-' रूपवर्धिनी स्पर्धा परीक्षा केंद्र व अभ्यासिकेच्या श्रीमकांचा बाप्पा उपक्रमात बोलताना व्यक्त केले. यावेळी आम्रपाली यांच्या हस्ते गणेश मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली. आम्रपाली यांनी स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांसोबत संवाद साधताना तृतीयपंथी समाजाच्या व्यथा मांडल्या. तृतीयपंथींना सहानुभुती नव्हे तर समान वागणुकीची गरज आहे. ते ही आपल्या समाजातील एक घटक आहेत हे मान्य करून त्यांना आपलेपणाने स्वीकारा. रोजगाराच्या संधी उपलब्ध करून द्या, असे आम्रपाली यांनी सांगितले. आम्रपाली सावली सोशल फौंडेशनच्या संस्थापक



### गरीब मुलांसाठी फुटपाथ शाळा

**» आम्रपाली यांनी स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांसोबत संवाद साधताना तृतीयपंथी समाजाच्या व्यथा मांडल्या. तृतीयपंथींना सहानुभुती नव्हे तर समान वागणुकीची गरज आहे. ते ही आपल्या समाजातील एक घटक आहेत हे मान्य करून त्यांना आपलेपणाने स्वीकारा. रोजगाराच्या संधी उपलब्ध करून द्या, असे आम्रपाली यांनी सांगितले. आम्रपाली सावली सोशल फौंडेशनच्या संस्थापक अध्यक्ष आहेत. तृतीयपंथींच्या न्याय हक्कासाठी काम करताना त्यांनी पुणे शहरात सहा ठिकाणी गरीब मुलांसाठी 'फुटपाथ शाळा' सुरु केल्या.**

अध्यक्ष आहेत. तृतीयपंथींच्या न्याय हक्कासाठी काम करताना त्यांनी पुणे शहरात सहा ठिकाणी गरीब मुलांसाठी 'फुटपाथ शाळा' सुरु केल्या. आपल्या संस्थेच्या माध्यमातून त्यांनी १४५ गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा खर्च उभा केला, तसेच १९२ लोकांना छोटे व्यवसाय सुरु करून दिले आहेत. 'स्व-' रूपवर्धिनी संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ संजय तांबट, संस्थेच्या जेष्ठ पूर्णवेळ कार्यकर्त्या पुष्पाताई नडे यांनी आम्रपाली मोहितेंचा भारतीय संविधानाचा सरनामा देऊन सन्मान केला. ३५ व्या पुणे फेस्टिव्हलच्या श्रींची प्रतिष्ठापना हॉटेल सारस, नेहरू स्टेडियम, पुणे येथे स्वाती व विक्रम कुमार (आयुक्त, पुणे महानगरपालिका) यांच्या शुभहस्ते विधिवत संपन्न झाली. याप्रसंगी अभिनेत्री तेजस्विनी लोणारी आणि प्राजक्ता गायकवाड प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होत्या. पुणे फेस्टिव्हलचे उपाध्यक्ष कृष्णकुमार गोयल, मुख्य समन्वयक ॲड. अभय छाजेड, , माजी महापौर कमल व्यव्हारे , डेक्कन मुस्लिम इंस्टीट्यूटचा अध्यक्षा आबेदा इनामदार ,बाळासाहेब अमराळे , राजू साठे , द.स पोळेकर, अतुल गोंजारी , राजू साठे, अशोक मेंमजादे, रवींद्र दुर्वे , सुप्रिया ताम्हणे, संयोगिता कुदळे, अनुराधा भारती ,निकिता मोघे व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पुणे शहरातील वाहतुकीत बदल

**पुणे | न्यूज एक्सप्रेस मराठी |** गणेशोत्सवात भाविकांची होणारी गर्दी विचारात घेऊन बुधवारपासून (२० सप्टेंबर) मध्यभागातील वाहतूक व्यवस्थेत बदल करण्यात येणार आहेत. भाविकांची होणारी गर्दी विचारात घेऊन सायंकाळी पाचनंतर मध्यभागातील रस्ते वाहतुकीस बंद करुन वाहतूक पर्यायी मार्गाने वळविण्यात येणार आहे. उत्सवाच्या कालावधीत शिवाजी रस्त्यावरील बेलबाग चौक ते रामेश्वर चौक (मंडई) दरम्यानची वाहतूक पूर्णपणे बंद ठेवण्यात येणार आहे. मध्यभागातील वाहतूक बदल विसर्जन मिरवणुकीपर्यंत लागू राहणार आहे. शिवाजीनगरकडून स्वारगेटकडे जाणाऱ्या सर्व वाहनांनी जंगली महाराज रस्त्यावरील स. गो. बर्वे चौक (मॉडर्न कॅफे चौक), जंगली महाराज रस्ता, खंडोजीबाबा चौक, टिळक चौकातून (अलका चित्रपटगृह) टिळक रस्ता किंवा शास्त्री रस्त्याने इच्छितस्थळी जावे. शिवाजीनगर भागातून स्टेशनकडे जाणाऱ्या वाहनांनी वेधशाळा चौक, शाहीर अमर शेख चौक, बोल्हाई चौकमार्गे पुणे स्टेशनकडे किंवा नेहरु रस्त्याने स्वारगेटकडे जावे, असे आवाहन वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त विजयकुमार मगर यांनी केले आहे. शिवाजीनगरहून स्वारगेटकडे जाणारे दुचाकीस्वार महापालिका भवन येथील टिळक पूल, नदीपात्रातील रस्त्यावरुन अलका चित्रपटगृहमार्गे इच्छितस्थळी जाऊ शकतील. बाजीराव रस्ता, तसेच केळकर रस्त्यावरुन येणाऱ्या वाहनांनी अप्पा बळवंत चौक, फुटका बुरूज चौक, गाडगीळ पुतळा, कुंभारवेस मार्गे इच्छितस्थळी जावे.

# पुण्यात ११ गणेश मंडळांनी एकत्रित मिरवणुकीने दिला एकात्मतेचा संदेश!

## भविष्यात धनकवडी भागात एकच मिरवणूक असेल : आ.भीमराव तापकीर

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** पुणे शहरातील धनकवडी भागात बुधवारी ११ गणेश मंडळांनी एकत्रित मिरवणुकीत जो एकात्मतेचा संदेश दिला आहे तो कौतुकास्पद आहे. भविष्यात या भागात एकच गणेश मंडळ दिसले यात शंका नाही. अशा मिरवणुकीमुळे एकता व सर्वधर्म समभावना वृध्दिगत होईल. असे मत आमदार भीमराव तापकीर यांनी व्यक्त केले. धनकवडी येथील साईनाथ मित्र मंडळ, श्री शिव छत्रपती मित्र मंडळ, आदर्श मित्र मंडळ, फाईव्ह स्टार मित्र मंडळ, केशव मित्र मंडळ, जय महाराष्ट्र मंडळ, अखिल नरवीर तानाजी नगर मित्र मंडळ , एकता मित्र मंडळ, विद्यानगरी मित्र मंडळ, रामकृष्ण मित्र मंडळ आणि अखिल मोहन नगर मित्र मंडळ अशा ११ गणेश मंडळांनी एकत्रित येऊन देशातील सर्वात



मोठी ही मिरवणूक स्वराज्य रथावर म्हणजेच ज्यात ११ गणेश मंडळांचे गणपती विराजमान करून भव्य मिरवणूक काढण्यात आली. या सर्व मंडळांनी बाप्पाचे जोरदार स्वागत केले. ज्ञानप्रबोधिनी वाद्य आणि गोविंद बँड पथक यांचा सुंदर ढोल ताशांचा गजरात बप्पांचे जोरदार स्वागत करण्यात आले. ही मिरवणूक गुलाबनगर, धनकवडी येथून सुरू होऊन धनकवडी गाव, केशव कॉम्प्लेक्स, विद्यानगरी, शिवशंकर चौक ते मोहननगर येथे काढण्यात आली. या प्रसंगी मनपाचे स्थायी समितीचे माजी अध्यक्ष विशाल तांबे, वर्षा तापकीर, आंतरराष्ट्रीय पॉवर लिफ्टींग चॅम्पियन सुप्रिया सुपेकर, गिर्यारोहक स्मिता घुगे व एशियन चॅम्पियनशिप सिल्व्हर मेडल विजेता पै. धनराज भरत शिर्के हे सन्माननीय पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच मंडळाचे अध्यक्ष रोहित पोळ, संतोष धनकवडे, उदय जगताप, आनंद शिंदे, विजय क्षीरसागर, प्रतिक कुंभार, अभिषेक तापकीर, अनिकेत झाड, अजय इंगळे, मिलिंद काळे व सोमनाथ शिर्के उपस्थित होते. सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून सफाई कामगारांचा सत्कार पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आला. भीमराव तापकरी म्हणाले, गेल्या वर्षी ९ मंडळांनी एकत्रित येऊन मिरवणूक काढली होती. परंतू या वर्षी ११ मंडळांचे कार्यकर्ते एकमेकांच्या मंडळात सहभागी झाल्याने एकतेचे वातावरण पहावयास मिळाले आहे. विशाल तांबे म्हणाले, लोकमान्य टिळक व भाऊ रंगारी यांनी सुरू केलेली सार्वजनिक मिरवणूकीचे हे दक्षिण पुण्यातील सर्वेत्तम उदाहरण आहे. आज पुण्यात रूजलेली ही संकल्पना भविष्यात संपूर्ण राज्यात रूजेल. पूर्वीच्या काळी एक गाव एक गणपती ही संकल्पना होती तीच पद्धत आता सार्वजनीक गणेश उत्सावात पहावयास मिळेल. पोलिस अधिकारी मळाळे म्हणाले, हा अत्यंत चांगला उपक्रम असून एकीकरणाची भावना वाढली आहे. या मुळे ध्वनी प्रदूषण कमी झाल्यामुळे जनतेला व पोलिसांना याचा फायदा होईल. यामध्ये जवळपास ५ ते ६ हजार गणेश भक्त सहभागी झाले होते.

### एक गाव एक गणपती ही संकल्पना

» भीमराव तापकरी म्हणाले, गेल्या वर्षी ९ मंडळांनी एकत्रित येऊन मिरवणूक काढली होती. परंतू या वर्षी ११ मंडळांचे कार्यकर्ते एकमेकांच्या मंडळात सहभागी झाल्याने एकतेचे वातावरण पहावयास मिळाले आहे. विशाल तांबे म्हणाले, लोकमान्य टिळक व भाऊ रंगारी यांनी सुरू केलेली सार्वजनिक मिरवणूकीचे हे दक्षिण पुण्यातील सर्वेत्तम उदाहरण आहे. आज पुण्यात रूजलेली ही संकल्पना भविष्यात संपूर्ण राज्यात रूजेल. पूर्वीच्या काळी एक गाव एक गणपती ही संकल्पना होती तीच पद्धत आता सार्वजनीक गणेश उत्सावात पहावयास मिळेल.

# भारताच्या विकासकरिता महिला आरक्षण विधेयक महत्वाचे!

## हे विधेयक महिलांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे : डॉ. नीलम गोऱ्हे

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, भाजप आणि एनडीए यांनी मनापासून इच्छा शक्ती दाखवली आहे. त्यामुळे महिला आरक्षण विधेयक संसदेमध्ये मांडणे शक्य झाले आहे. यामुळे महिलांना देशाच्या विकासात सहभागी होण्याची संधी मिळणार आहे. हे विधेयक महिलांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे असून या विधेयकाचे स्वागत करत असल्याचे उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी सांगितले. मोदी सरकारच्या मंत्रिमंडळाच्या कॅबिनेटमध्ये महिला आरक्षणाच्या विधेयकाला मंजुरी मिळाली. या विधेयकाला मंजुरी मिळाल्यानंतर महाराष्ट्र विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी बुधवारी पुणे येथील निवासस्थानी पत्रकार परिषद घेऊन महिला आरक्षण विधेयकावर भाष्य केलं. यावेळी उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे म्हणाल्या, हिंसा, पैशाचा वापर आणि चारित्र्यहनन यामुळे स्त्रियांचा राजकारणातला सहभाग अपुरा राहिला आहे.

यापूर्वी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना ५० टक्के आरक्षण जरी असले तरी लोकसभा विधानसभा यामध्ये महिलांच्या सहभागाचे प्रमाण दहा ते पंधरा टक्केच राहिले आहे. जे राजकीय पक्ष म्हणतात



महिलांना राजकारणात संधी द्यायला पाहिजे, त्यांच्या कार्यकारणीमध्ये, नेतेपदी एका देखील महिलेचा सहभाग नाही. या आरक्षणामुळे आगामी काळात महिलांचा राजकारणातील सहभाग वाढण्यास निश्चितच मदत होणार आहे.या विधेयकानुसार महिलांना धोरणात्मक निर्णयांमध्ये सहभागी होता येणार असून स्त्री शक्तीचे आयुष्य अधिक सुलभ करण्यावर भर देण्यात आला असल्याचे डॉ. गोऱ्हे यांनी सांगितले. संयुक्त राष्ट्र संघाने जाहीर केले नुसार जगात २०३० पर्यंत समाजाच्या सर्व क्षेत्रांमध्ये महिलांच्या सहभागाचे प्रमाण ५० टक्के असेल असे निश्चित करण्याचे जाहीर केले आहे. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज घेतलेल्या निर्णयाची जगात दखल घेतली जात असल्याचे डॉ. गोऱ्हे यांनी नमूद केले. लवकरच महाराष्ट्र विधिमंडळात हे विधेयक मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखाली मंजूर करण्यात येऊन ते संपूर्ण महाराष्ट्रात लागू केलं जाईल अशी खात्री डॉ. गोऱ्हे यांनी व्यक्त केली.

### आयुष्य अधिक सुलभ करण्यावर भर

» या विधेयकानुसार महिलांना धोरणात्मक निर्णयांमध्ये सहभागी होता येणार असून स्त्री शक्तीचे आयुष्य अधिक सुलभ करण्यावर भर देण्यात आला असल्याचे डॉ. गोऱ्हे यांनी सांगितले. संयुक्त राष्ट्र संघाने जाहीर केले नुसार जगात २०३० पर्यंत समाजाच्या सर्व क्षेत्रांमध्ये महिलांच्या सहभागाचे प्रमाण ५० टक्के असेल असे निश्चित करण्याचे जाहीर केले आहे. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज घेतलेल्या निर्णयाची जगात दखल घेतली जात असल्याचे डॉ. गोऱ्हे यांनी नमूद केले.